सन्मित्र दि. १२-९-२०१५

# विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रम संपन्न

ठाणे, दि. ११ - ५ सप्टेंबर - शिक्षण दिनी विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात अकरावी विज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी आपल्याला ज्या विषयात गती आहे त्या विषयाचे २०-२० मिनिटांचे व्याख्यान देऊन (यामध्ये प्रात्यक्षिक, पी.पी.टी. आकृत्या इत्यादींचा समावेश होता) एका अनोख्या पद्धतीने शिक्षक दिन साजरा केला.

वेळापत्रकाप्रमाणे प्रत्येक वर्गाचे स्वतंत्र वेळापत्रक ठरवणे, त्यांच्या तासिकांमध्ये कुठेही खंड न पडता व कुणावरही जादा कार्यभार न देता व्यवस्थित व सुटसुटीत व्याख्यानांची आखणी करणे आणि शिकवण्यास दिलेला विषय वेळेत संपविणे सर्व प्रशासकीय कामकाज विद्यार्थीच पाहत होते, अशी माहिती जागर जाणिवांचे समन्वयक प्रा. अनिल आठवले यांनी दिली. शिक्षक दिन म्हणजे फक्त सादरीकरण नसून तो एक संस्कार व सांस्कृतिक भाग असतो. भावी पिढीला हा वारसा जतन करून ठेवायला हवा असे मत यावेळी सांस्कृतिक मंडळाचे समन्वयक प्रा. प्रकाश माळी यांनी व्यक्त केले.

भारतात गुरु-शिष्य परंपरा फार पुरातन काळापासून असून आपण एकप्रकारे आपल्या गुरुजनांना अभिवादन करण्याचाच हा प्रतिकात्मक प्रयत्न आहे असे मत मराठी विभागप्रमुख प्रा. बिपीन धुमाळे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी विविध खेळांचे आयोजन करून हा शिक्षकदिन बहारदार केला. विद्यार्थी रोजच व्याख्याने, प्रात्यक्षिके, सेमिनार यामध्ये गुरफटलेला असतो. परंतु खेळीमेळीने सर्जनशील मार्गाने जर शिक्षक मार्गदर्शन करतील तर तो एक अनोखा प्रयोग होतो, असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. किरण पारीया यांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनी स्वत:च्या विषयाची सखोल माहिती जमविली होती व साहित्य, कला, संस्कृती यांचे अनोखे व वेगळे दर्शन घडविले. अकरावी व पदवी महाविद्यालय मिळून जवळजवळ ५०० विद्यार्थी यात सहभागी झाले होते.

व्याख्याने, गंमतीदार खेळ आदी विविध कार्यक्रमांनी नटलेल्या या शिक्षक दिनाचे आयोजन सुंदर होते. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एच. बी. काटकर व पुष्पा कृष्णन यांनी प्रशासनाची बाजू सांभाळली. अंतिमत: राष्ट्रगीताने हा शिक्षक दिन कार्यक्रम संपन्न झाला.